# महामेट्रो , पुणे वाहतूक विभाग , पुणे महानगर पालिकेचे अधिकारी आणि पौड रॉड विभागातील नगरसेवकांकडून पौड रॉड वरील रस्त्यांची एकत्रित पाहणी

पुणे १९ जुलै २०१८ : महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन आणि पौड रोड विभागातील नगरसेवक आणि स्थायी समितीचे माजी अध्यक्ष मुरलीधर मोहोळ यांनी एकत्र मिळून पौड रॉड , येथील रस्त्यावरील खड्डे आणि वाहतूक कोंडी याची प्रत्यक्ष पाहणी केली आहे . या पाहणीमध्ये महामेट्रोच्या पुणे मेट्रोचे कार्यकारी संचालक रामनाथ सुब्रमण्यम , वनाज ते रामवाडी या मार्गिकेचे कार्यकारी संचालक अतुल गाडगीळ तसेच महामेट्रोचे अधिकारी आणि पुणे महानगर पालिकेच्या अधिकारी वर्गाचा समावेश होता .आणि वाहतूक विभागाचे असिस्टंट पोलीस कमिशनर श्री . ढमाले आणि पोलीस इन्स्पेक्टर प्रतिभा जोशी ह्याही उपस्थित होत्या .

ही पाहणी करताना निदर्शनास आलेले पौड रोड आणि कर्वे रोड येथील रस्त्यावरील खड्डे बुजविले जातील . फूटपाथ वर पडलेला राडारोडा त्वरित उचलला जाईल . ज्या क्षेत्रात पुणे मेट्रोचे बर्रीकॅडेस आहेत त्या बाजूच्या रस्त्याची देखभालीची जबाबदारी महामेट्रो घेणार आहे . असे महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे . तसेच ह्या रस्ता देखभालीचा निर्णय या एकत्रित झालेल्या पाहणी मध्ये घेण्यात आला आहे . आणि फूटपाथ देखभालीची जबाबदारी पुणे महानगर पालिका घेणार आहे . मॅन होल रिपेअर करणे आणि आनंद नगर भागातील जे थोडेसे फूटपाथ कटींग राहिले आहे ते ही कट केले जाणार आहे .

पौड रोड वरील महामेट्रोचे काम चाललेल्या ज्या बॅरिकेडिंगची लांबी जी ९ मी आहे ती कमी होऊ शकते का याचा महामेट्रो तर्फे विचार केला जाईल . पाहणी करताना ज्या ज्या सूचना त्या विभागातील नगरसेवक यांकडून आणि वाहतूक विभागाकडून महामेट्रोला करण्यात आल्या आहेत . त्यावर महामेट्रो सकारात्मक पणे नक्कीच विचार करेल असे आश्वासन महामेट्रोचे कार्यकारी संचालक रामनाथ सुब्रमण्यम यांनी दिले .

For More Information :

Archana Gangawane. Pune metro PRO Assistant

Mob . No- 8625014063